# आज मर्यादित स्वरूपात भूमिपुत्र निर्धार परिषद



**पनवेल :** लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीदिनी गुरुवारी (दि. १३) कोल्ही कोपर येथे भूमिपुत्रांची निर्धार परिषद आयोजित करण्यात आली आहे. लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने जाहीर केल्याप्रमाणे ही परिषद कोविडचा प्रोटोकॉल पाळून मर्यादित स्वरूपात होणार आहे. या परिषदेला पनवेल, उरण विभागातील प्रमुख कार्यकर्ते व विमानतळबाधित २७ गावचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याचे कृती समितीतर्फे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी जाहीर केले. दरम्यान, कोरोनाच्या मोठ्या स्वरूपाच्या लाटेमुळे परिषदेचे स्वरूप बदलण्यात आले असले, तरी गुरुवारी सकाळी ११ वाजता एकाच वेळेला 'दिबां'ची जयंती आपापल्या गावांमध्ये, विभागांमध्ये साजरी होईल. त्यानंतर प्रमुख कार्यकर्ते कोल्ही कोपर येथे येतील असे ठरले आहे, तसेच सिडको व्यवस्थापकीय संचालकांबरोबर होणाऱ्या बैठकीत भूमिपुत्रांच्या बाबतीत प्रश्न मार्गी न लागल्यास २४ जानेवारी रोजी काम बंद आंदोलन करणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.


गुरुवार, १३ जानेवारी २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक १७७
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड


## भाजप ओबीसी मोर्चाकडून पंजाब सरकारचा निषेध

# पनवेलमध्ये मानवी साखळी आंदोलन

## ■ पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सुरक्षेतील त्रुटीविरोधात निदर्शने



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ जानेवारी रोजी पंजाबच्या दौऱ्यावर असताना तेथील काँग्रेस सरकारने सुरक्षाव्यवस्थेत त्रुटी ठेवल्या. सुरक्षेत केलेली कुचराई व कटकारस्थान रचून केलेल्या चुकीमुळे पंजाबमधील काँग्रेस सरकारचा देशभरात निषेध व्यक्त करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर पनवेल येथील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयाजवळ भाजप ओबीसी मोर्चाच्या वतीने बुधवारी (दि. १२) मानवी साखळी आंदोलन करून पंजाब सरकारच्या या कृतीचा निषेध करण्यात आला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ जानेवारी रोजी पंजाबच्या दौऱ्यावर असताना तेथील काँग्रेस सरकारने सुरक्षाव्यवस्थेत त्रुटी ठेवल्या. सुदैवाने पंतप्रधान संकटातून बचावले. पंजाबमधील काँग्रेस सरकारने अतिशय खालच्या स्तराच्या मानसिकतेतून हेतुपुरस्सरपणे घडविलेल्या या घटनेचा निषेध म्हणून भाजप ओबीसी मोर्चाच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. के. लक्ष्मण व प्रदेश अध्यक्ष योगेश टिळेकर यांच्या निर्देशावरून बुधवारी सर्व जिल्हा व मंडल स्तरावर मानवी साखळी आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. त्यानुसार पनवेलमध्येही ओबीसी मोर्चाच्या वतीने ही मानवी साळखी आंदोलन करून या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. हे आंदोलन कोरोना नियमांचे पालन करून काळे मास्क तोंडावर बांधून, तसेच गळयात भाजपचा दुपट्टा घालून करण्यात आले.

या वेळी ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सर्वसामान्य जनतेचे नेते असून, त्यांच्या सुरक्षेत पंजाबमधील काँग्रेस सरकारने निकृष्ट मानसिकतेने त्यांच्या सुरक्षेत कुचराई केली या घटनेचा निषेध व्यक्त केला.

या मानवी साखळी आंदोलनाच्या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ओबीसी मोर्चाच्या महिला जिल्हाध्यक्ष तथा उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, ओबीसी मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष राजेश गायकर, शहर अध्यक्षा तथा प्रभाग समिती सभापती ॲड. वृषाली वाघमारे, प्रमिला पाटील, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, भाजप नेते एकनाथ देशेकर, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, पनवेल शहर सरचिटणीस अमरिश मोकल, ओबीसी पनवेल शहर अध्यक्ष रामनाथ पाटील, राकेश भुजबळ, नितीन भुजबळ, अजित लोंढे, किशोर शिंदे, संजय जैन यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोरोना रुग्णसंख्या वाढ; केंद्राकडून राज्यांना पुन्हा सूचना




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशात कोरोनाच्या रुग्णांची संख्या वाढत असताना केंद्र सरकारने राज्यांना सतर्क केले आहे. केंद्र सरकारने राज्यांना पुन्हा पत्र लिहिले आहे. राज्यांनी आपल्याकडे ऑक्सिजनचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा, अशी सूचना केंद्राने राज्यांना केली आहे.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे सचिव राजेश भूषण यांनी राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांना पत्र लिहिले आहे. पुरेसा मेडिकल ऑक्सिजन उपलब्ध राहील, याची काळजी राज्यांनी घ्यावी. यासाठी तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी सूचना त्यांनी राज्यांच्या मुख्य सचिवांना केली आहे.

रुग्णांची काळजी घेणाऱ्या सर्व आरोग्य सुविधा सज्ज ठेवा आणि किमान ४८ तास वैद्यकीय ऑक्सिजनचा पुरेसा बफर स्टॉक उपलब्ध ठेवा. सर्व आरोग्य सुविधांमध्ये लिक्वीड वैद्यकीय ऑक्सिजन टाक्या पुरेशा प्रमाणात भरलेल्या हव्यात. रिफिलिंग टँकर्सचा अखंड पुरवठा असावा. सर्व पीएसए प्लांट पूर्ण कार्यक्षमतेने चालण्याच्या स्थितीत असावेत, प्लांटच्या देखभालीसाठी सर्व आवश्यक पावले उचलली जावीत. सर्व आरोग्य केंद्रांवर पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन सिलिंडर असावेत. ऑक्सिजन सिलिंडरमध्ये बॅकअप स्टॉक आणि मजबूत रिफिल सिस्टम असणे आवश्यक आहे. उच्च दर्जाच्या रुग्णालयांमध्ये लाइफ सपोर्ट उपकरणे उपलब्ध असावीत. ऑक्सिजन नियंत्रण कक्ष पुन्हा सुरू करावेत, अशा सूचना केंद्राने राज्यांना दिल्या आहेत.

दरम्यान, महाराष्ट्र राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत असली तरी घाबरून न जाण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे. राज्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढत असली तरी त्यातील ८६ टक्के रुग्णांना सौम्य लक्षणे असून ते गृहविलगीकरणात आहेत. उर्वरित १४ टक्क्यांमध्येही केवळ २.८ टक्के रुग्ण गंभीर वर्गवारीत येतात, अशी माहिती आरोग्यमंत्र्यांनी दिली.

## राज्यातील सर्वच दुकानांवर झळकणार मराठी पाट्या

**मुंबई :** राज्यातील सर्व छोट्या-मोठ्या दुकानांवरील पाट्या आता मराठी भाषेतून ठेवाव्या लागणार आहेत. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय बुधवारी (दि. १२) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या निर्णयामुळे राज्यातील सर्व दुकानांवरील पाट्या मराठी भाषेतून झळकणार आहेत. दरम्यान, भाजपचा मराठीचा सातत्याने आग्रह राहिला आहे.

# महाराष्ट्रावर ड्रोन हल्ल्याचे सावट

## मुंबईसह प्रमुख शहरांसाठी अलर्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिन जेमतेम दोन आठवड्यांवर येऊन ठेपला असताना महाराष्ट्रावर दहशतवादी हल्ल्याचे सावट आहे. विशेष म्हणजे या वेळी राज्यात ड्रोनच्या माध्यमातून हल्ला होण्याचा धोका व्यक्त केला जात आहे. केंद्रीय तपास यंत्रणेमार्फत सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व प्रमुख शहरे अलर्टवर आहेत. नागरिकांनाही सतर्क राहण्याच्या सूचना तपास यंत्रणांच्या माध्यमातून देण्यात आल्या आहेत.

ड्रोन जितके उपयोगी आहेत, तितकेच ते धोकादायकही आहेत. जम्मू-काश्मीर आणि पंजाबमध्ये संभाव्य ड्रोन हल्ल्यांबाबत केंद्रीय तपास यंत्रणा सतत सतर्कतेची सूचना देत असतात. तपास यंत्रणांना नुकतीच अशी माहिती मिळाली आहे की, डार्क नेटचा वापर करून मुंबई आणि महाराष्ट्रात ड्रोन हल्ला घडवण्याबद्दल दहशतवादी संभाषण करत आहेत.

## निवडक

### पंजाबचे मुख्यमंत्री चन्नींच्या भावाचा भाजपमध्ये प्रवेश

**चंदिगड :** पंजाबमध्ये एक राजकीय भूकंप झाला आहे. मुख्यमंत्री चरणजीतसिंग चन्नी यांचे चुलत बंधू जसविंदर सिंग धालिवाल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांच्या उपस्थितीत चंदिगडमध्ये जसविंदर सिंग यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे पंजाबच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी कोरोना पॉझिटिव्ह

**मुंबई :** केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांना दुसऱ्यांदा कोरोनाची लागण झाली आहे. त्यांनी याबाबत ट्विट केले आहे. माझ्या संपर्कात आलेल्या सर्वांना कोरोना चाचणी करून घेण्याचे आवाहन केले आहे. सध्या गडकरी यांना सौम्य लक्षणे आहेत, तसेच सध्या ते गृहविलगीकरणात आहेत. त्याच्यावर उपचार सुरू आहे.

## पनवेलमध्ये आठवी राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

# भरघोस रकमेच्या पारितोषिकांनी यंदाही होणार विजेत्यांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आठवी अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. राज्यातील सर्व केंद्रांवर प्राथमिक फेऱ्या पार पडल्या असून अंतिम फेरीसाठी २५ एकांकिकांची निवड झाली आहे. कोरोना संदर्भात नियमांचे पालन करून अंतिम फेरी २९, ३० आणि ३१ जानेवारी २०२२ रोजी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.

नाट्यचळवळ वृद्धिंगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धिंगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका सभागृह नेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली. **(पान २ वर..)**

### अंतिम फेरीसाठी २५ एकांकिकांची निवड

*सेल नसलेला रेडिओ (नूतन मराठा कॉलेज, जळगाव), पहाटेचा मृत्यू (अंभृणी सेवा संस्था, नागपूर), सूर्याची सलामी (व्हीएमव्ही कॉलेज, नागपूर), माझी बाजू माझा पक्ष (डॉ. विठ्ठलराव खोब्रागडे शिक्षण संस्था, नागपूर), स. न. वि. वि. (देवल क्लब, कोल्हापूर), विषाद (रंगपंढरी, पुणे), आय ॲग्री टू (आमचे आम्ही पुणे, पुणे), चिऊताई चिऊताई दार उघड (स्पॉट लाईट पनवेल, पुणे), त्रिशंकू (कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरण, रायगड), गुज (फ्रायडे, अलिबाग, रायगड), पार्वती सदन- १०५ अ, ब, क (सी. के. ठाकूर स्वायत्त महाविद्यालय, रायगड), हायब्रीड (ॲबस्ट्रॅक्ट थिएटर, मुंबई), मानलेली गर्लफ्रेंड (इंद्रधनु, मुंबई), साबण (मृदा, कल्याण), राकस (कलासक्त, मुंबई), प्रसाद (रुईया कॉलेज, मुंबई), बेकलाइटी बेकलाइटी (मिथक, मुंबई), जनावर (प्राण, मुंबई), ए वन (माध्यम कलामंच, मुंबई), मौनांतर (नागाबादेवी कलामंच, वसई), व्हेन सुमेध मिट्स राधिका (फोर्थ वॉल, ठाणे) बिलिमारो (ढ मंडळी, कुडाळ), मनस्विनी (निर्माती, वसई), तिडीक (प्रमुख थिएटर्स, मुंबई), लेखक (कल्लाकार्स थिएटर, ठाणे).*






# आमदार नितेश राणे यांना अटक कारवाईपासून दिलासा



**सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

शिवसेना पदाधिकारी संतोष परब हल्ला प्रकरणात अडचणीत सापडलेले भाजप आमदार नितेश राणे यांना अटकेसारख्या कठोर कारवाईपासून मिळालेला दिलासा कायम आहे. अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत अटक केली जाणार नाही, अशी ग्वाही कणकवली पोलिसांकडून मुंबई हायकोर्टात दिली आहे.

संतोष परब हल्ला प्रकरणात स्थानिक कोर्टाने जामीन फेटाळल्यानंतर भाजप आमदार नितेश राणे यांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली होती. मुंबई हायकोर्टात मागील मंगळवारी सकाळी राणे यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी झाली होती. त्या वेळी त्यांना मोठा दिलासा मिळाला होता. राज्य सरकारने ७ जानेवारीपर्यंत नितेश राणे यांच्यावर अटकेसारखी कठोर कारवाई करणार नाही, अशी ग्वाही कोर्टात दिली होती. त्यामुळे राणे यांना अटकेपासून संरक्षण मिळाले होते.

यानंतर, बुधवारी (दि. १२) पुन्हा मुंबई हायकोर्टात सुनावणी झाली. राणे यांना अटकेसारख्या कठोर कारवाईपासून मिळालेला दिलासा कायम आहे. अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत त्यांना अटक केली जाणार नाही, अशी ग्वाही कणकवली पोलिसांनी मुंबई हायकोर्टात दिली आहे. आजची सुनावणी अपूर्ण राहिल्याने गुरुवारी (दि. १३) दुपारी १ वाजता पुन्हा सुनावणी होणार आहे.

## 'कोवॅक्सिनचा बूस्टर डोस ओमायक्रॉन, डेल्टावर भारी'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशात कोरोना व ओमायक्रॉनचा संसर्ग वाढत असतानाच एक दिलासादायक बातमी आली आहे. कोवॅक्सिनचा बूस्टर डोस ओमायक्रॉन आणि डेल्टाला निष्क्रिय करण्याची क्षमता आहे, असे चाचण्यांमधून दिसून आल्याचा दावा भारत बायोटेकने केला आहे.

भारत बायोटेकने म्हटले की, आमच्या क्लिनिकल ट्रायलमध्ये ३०,००० लोकांवर चाचण्या घेण्यात आल्या. यामध्ये १० ते २० टक्के व्यक्तींना साईड इफेक्ट जाणवले आहेत. बऱ्याच जणांमध्ये हे साईड इफेक्ट सौम्य स्वरूपाचे आहेत, जे एक-दोन दिवसांत निघून जातात. त्यासाठी औषध घेण्याची गरज नाही. केवळ तुमच्या डॉक्टरांनी औषध घेण्याची शिफारस केली, तर लस घेतल्यानंतर औषधांची गरज पडते.








# उपमहापौर सीताताई पाटील यांनी स्वीकारला पदभार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या उपमहापौरपदी भाजपच्या ज्येष्ठ नगरसेविका सीताताई पाटील, स्थायी समिती सभापतीपदी अ‍ॅड. नरेश ठाकूर आणि महिला व बालकल्याण सभापतीपदी हर्षधा उपाध्याय यांची निवड झाली. या सर्व नवनिर्वाचित पदाधिकार्‍यांनी बुधवारी (दि. १२) आपल्या दालनात पदग्रहण करून आपला पदभार स्वीकारला त्यानिमित्त महापौर डॉ. कविता चौतमोल आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी प्रभाग समिती सभापती अरुणा भगत, प्रमिला पाटील, स्थायी समितीचे माजी सभापती तथा नगरसेवक संतोष शेट्टी, माजी प्रभाग समिती सभापती तथा नगरसेवक समीर ठाकूर, अजय बहिरा, मनोज भुजबळ, अनिल भगत, नगरसेविका चारुशीला घरत, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, भाजप नेते सदानंद पाटील, कमलाकर घरत, अमर उपाध्याय यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



# सुभाष भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ यांचा वाढदिवस मंगळवारी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा झाला. वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल येथे नॅशनल हेल्थ कार्ड आणि ई-श्रम कार्ड वाटप कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, नगरसेवक तेजस कांडपिळे, राकेश भुजबळ, मच्छिंद्र पाटील, नितीन भुजबळ, अजित लोंढे, किशोर शिंदे, भरत भुजबळ, सिद्धेश भुजबळ आदी उपस्थित होते.

## बोकडविरा ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी शेखर पाटील

**उरण : बातमीदार**

तालुक्यातील बोकडविरा ग्रामपंचायतची उपसरपंचपदाची निवडणूक नुकतीच झाली असून या ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भारतीय जनता युवा मोर्चा उरण तालुकाध्यक्ष शेखर भास्कर पाटील यांची निवड झाली आहे. बोकडविरा ग्रामपंचायतीचे नऊ ग्रामपंचायत सदस्य व सरपंच असे एकूण १० सदस्य असून ग्रामसेवक अनिता पाटील, सरपंच मानसी पाटील यांच्या उपस्थितीत ही निवडणूक संपन्न झाली. शेखर पाटील यांची उपसरपंचपदी निवड झाल्याने त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.



**पनवेल : भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे नवीन पनवेल अध्यक्ष अमन अख्तर यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अमन अख्तर यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, अल्पसंख्यास मोर्चाचे नवीन पनवेल शहर उपाध्यक्ष इम्रान खान आणि ग्रामपंचायत सदस्य दिवेश भगत उपस्थित होते.**



**पनवेल : राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी पनवेल महापालिकेमध्ये त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी पनवेल महापालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, प्रभाग समिती सभापती प्रमिला पाटील, नगरसेविका चारुशीला घरत, समीर ठाकूर, भाजप नेते सदानंद पाटील, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.**



**पनवेल : विद्यापीठात होणार्‍या राजकीय हस्तक्षेपाचा, तसेच कायदा सुधारणा विधेयकाचा भाजप युवा मोर्चातर्फे विविध कार्यक्रम राबवून निषेध करण्यात येत आहे. त्यानुसार पनवेल भाजप युवा मोर्चाच्या वतीने सीकेटी महाविद्यालयात स्वाक्षरी मोहीम बुधवारी राबविण्यात आली. या मोहिमेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस चिन्मय समेळ, शहर अध्यक्ष रोहित जगताप, नूतन पाटील, देवांशु प्रभाळे, आकाश भाटी, ओम करमरकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.**



**पनवेल : महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘ब’च्या सभापतीपदी प्रमिला पाटील यांची निवड झाल्याबद्दल भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## ‘लोकनेते दि. बा. पाटील फेलोशिप’ची घोषणा

**मुंबई :** प्रकल्पग्रस्त व आगरी, कोळी बांधवांचे ज्येष्ठ नेते दि. बा. पाटील यांच्या सन्मानार्थ दि. बा. पाटील फेलोशिप अर्थात पाठ्यवृत्तीची बुधवारी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी घोषणा केली. फेलोशिपच्या पोस्टरचे अनावरण राज ठाकरे यांनी केले. या उपक्रमातून महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांवर अभ्यास होईल, हा सर्व अभ्यास महाराष्ट्रासमोर यावा, अशी सूचना या वेळी राज ठाकरे यांनी संयोजकांना केली आहे. तसेच या उपक्रमास मनापासून शुभेच्छा देत असल्याचे त्यांनी सांगितले.

## दुखवटा

## यशोदा कडवे



**पनवेल :** गुळसुंदे गावातील ज्येष्ठ नागरिक यशोदा ऊर्फ येसूबाई महादेव कडवे यांचे वयाच्या ८० व्या वर्षी मंगळवारी (दि. ११) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात विवाहित मुलगा, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. यशोदा यांच्या पार्थिवावर गुळसुंदे येथील स्मशानभूमीत कोरोना संदर्भातील नियम पाळून अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नातेवाईक, ग्रामस्थ उपस्थित होते. यशोधा यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि. २०) श्रीक्षेत्र गुळसुंदे येथे, तर उत्तरकार्य राहत्या घरी रविवारी होणार आहे.

## मेहता पब्लिशिंगचे संचालक सुनील मेहता यांचे निधन



**पुणे :** पुण्यातल्या मेहता पब्लिशिंग हाऊस या प्रसिद्ध प्रकाशन संस्थेचे संचालक सुनील मेहता यांचे बुधवारी (दि. १२) निधन झाले. ते ५६ वर्षांचे होते. गेल्या १५ दिवसांपासून मेहता हे पुण्यातल्या पूना हॉस्पिटलमध्ये किडनी स्टोनसाठी उपचार घेत होते. उपचारादरम्यान हळूहळू अवयव निकामी होत गेल्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
गुरुवार, दि. १३ जानेवारी २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
- २. सिडको समाज मंदिर, से. ५ ई (ना.पा.आ.के.४, कळंबोली)
- ३. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ४. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
- ५. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणार्‍या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ६. ज्ञानसाधना केंद्र, से. ६, कामोठे
- ७. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ८. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ९. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १०. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- ११. सेंट्रल रेल्वे पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- १३. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली
- १४. काळण समाज हॉल, पनवेल

१५ ते १८ वयोगटाचे लसीकरण

- **ड्यू ड्रॉप स्कूल (उपलब्ध लसी ४०)**
- **शेठ लक्ष्मीदास गुजराती हायस्कूल पनवेल (२०)**
- **बार्न्स हायस्कूल (१०७)**
- **इंग्लिश स्कूल पनवेल (५३)**
- **हुडा इंग्लिश स्कूल पनवेल (६३)**
- **प्रयेश मराठी आणि इंग्रजी माध्यमिक शाळा से-१६, कळंबोली (९२)**
- **न्यू इंग्लिश स्कूल देवीचा पाडा (१७०)**
- **न्यू सिटी सरस्वती विद्यालय मराठी माध्यमिक शाळा खारघर (८३)**
- **न्यू सिटी आंतरराष्ट्रीय इंग्रजी माध्यमिक शाळा खारघर (१४०)**
- **सत्याग्रह ज्यु. कॉलेज थारवानी हेरिटेज एसईसी ७ खारघर (१६०)**
- **सुधागड एज्युकेशन सोसायटी माध्य. विद्यालय कोपरा खारघर (११०)**
- **एमबीएम गोल्डन स्कूल, पेंधर (६२)**
- **दिवंगत नामदेवबुवा खुटारीकर शाळा तळोजा पाचनंद (७१)**


पान १ वरून

# पनवेलमध्ये आठवी राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. त्यामुळे ही स्पर्धा राज्यात नावाजली असून उत्कृष्ट कामगिरी करणार्‍या स्पर्धकांना यंदाही भरघोस रकमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड, तर सहप्रायोजक नील ग्रुप आहे.

**अशी आहेत पारितोषिके-** प्रथम क्रमांक १ लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय क्रमांक ५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक २५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ एकूण दोन बक्षिसे प्रत्येकी ५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

**सर्वोत्कृष्ट अभिनेता, अभिनेत्री (वैयक्तिक)-** प्रथम क्रमांक २ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक १ हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक १ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उतेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (वैयक्तिक)-** प्रथम क्रमांक २ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक १ हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक १ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उतेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट लेखक (वैयक्तिक)-** प्रथम क्रमांक २ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक १ हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक १ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उतेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट संगीत (वैयक्तिक)-** प्रथम क्रमांक २ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक १ हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक १ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उतेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट नेपथ्य (वैयक्तिक)-** प्रथम क्रमांक २ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक १ हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक १ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उतेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना (वैयक्तिक)-** प्रथम क्रमांक २ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक १ हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक १ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उतेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**रायगड जिल्हा प्राथमिक फेरीकरिता विशेष पारितोषिके-** प्रथम क्रमांक १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक ७ हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक ५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**अंतिम फेरीकरिता विशेष पारितोषिके-** सर्वोत्कृष्ट विनोदी एकांकिका, महाराष्ट्रातील अस्सल मायबोली एकांकिका, लोककलेवर आधारित एकांकिका, सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार व बालकलाकार यांनाही विशेष पारितोषिकांनी सन्मानित करण्यात येणार आहे.


**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि. रायगड**

क्रमांक/आरटीएस अपील क्र. ०४/२०१९

१ श्री. किशोर कांतीलाल मणियार
रा. ६०२, तुलसी व्हिला, पोतदार रोड, सांताक्रुझ, प. मुंबई — अपिलार्थी

**विरुद्ध**

१ श्री. कनु मणिलाल ठक्कर
२ श्रीम. ज्योती कनु ठक्कर
दोघेही रा. ४०३, अलकनंदा, निळकंठ वेली, राजावाडी, घाटकोपर पूर्व, मुंबई - ४०० ०७७
३ सेंट्रल बँक ऑफ इंडिया
पत्ता - सि/१, फिरोजशहा नगर, हिल साईड, एल बी एस मार्ग, विक्रोळी, पश्चिम, मुंबई - ४०० ०७९
४ मे. विनय कन्टेनर्स सर्व्हिसेस प्रा. लिमिटेड
पत्ता- कोट नाका, उरण पोस्ट ऑफीस समोर, ता. उरण, जि. रायगड व मौजे चिर्ले, पो. जासई, जे एन पी टी हायवे, ता. उरण, जि. रायगड
५ श्री. विलास जे खैरे
६ श्रीम. अरुणा विलास खैरे
अ. क्र. ५ व ६, रा. कोट नाका, उरण पोस्ट ऑफीस समोर, ता. उरण, जि. रायगड - ४०० ७०२
७ श्री गणेश कॅपलिक्स प्रा. लिमिटेड तर्फे श्री. अतुल कांतीलाल शहा
रा. ६/८, अनंत वाडी, ३३ नगर निवास, भुलेश्वर, मुंबई — उत्तरार्थी

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे चिर्ले, ता. उरण, जि. रायगड येथील सर्वे नं./हिस्सा नं. ६४/९ (जुना नं. ४४/९) क्षेत्र ०-६१-० आकार १.५० या जमीन मिळकतीसंदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि. २४/०६/२०१९ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये **दि. १९/०१/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी** निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वत: अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपीलाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. याची कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : १०/०१/२०२२**

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी करीता**



**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि. रायगड**

क्रमांक/आरटीएस अपील क्र. ०५/२०१९

१ श्री. किशोर कांतीलाल मणियार
रा. ६०२, तुलसी व्हिला, पोतदार रोड, सांताक्रुझ, प. मुंबई — अपिलार्थी

**विरुद्ध**

१ श्री. कनु मणिलाल ठक्कर
२ श्रीम. ज्योती कनु ठक्कर
दोघेही रा. ४०३, अलकनंदा, निळकंठ वेली, राजावाडी, घाटकोपर पूर्व, मुंबई - ४०० ०७७
३ सेंट्रल बँक ऑफ इंडिया
पत्ता - सि/१, फिरोजशहा नगर, हिल साईड, एल बी एस मार्ग, विक्रोळी, पश्चिम, मुंबई - ४०० ०७९
४ मे. विनय कन्टेनर्स सर्व्हिसेस प्रा. लिमिटेड
पत्ता- कोट नाका, उरण पोस्ट ऑफीस समोर, ता. उरण, जि. रायगड व मौजे चिर्ले, पो. जासई, जे एन पी टी हायवे, ता. उरण, जि. रायगड
५ श्री. विलास जे खैरे
६ श्रीम. अरुणा विलास खैरे
अ. क्र. ५ व ६, रा. कोट नाका, उरण पोस्ट ऑफीस समोर, ता. उरण, जि. रायगड - ४०० ७०२
७ श्री गणेश कॅपलिक्स प्रा. लिमिटेड तर्फे श्री. अतुल कांतीलाल शहा
रा. ६/८, अनंत वाडी, ३३ नगर निवास, भुलेश्वर, मुंबई — उत्तरार्थी

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे चिर्ले, ता. उरण, जि. रायगड येथील सर्वे नं./हिस्सा नं. ६४/९ (जुना नं. ४४/९) क्षेत्र ०-६१-० आकार १.५० या जमीन मिळकतीसंदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि. २४/०६/२०१९ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये **दि. १९/०१/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी** निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वत: अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपीलाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. याची कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : १०/०१/२०२२**

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी करीता**

## नवी मुंबईमध्ये कोरोनाबाधित उपचाराधीन अधिक

# रुग्णवाढीने आरोग्य व्यवस्थेची कसरत



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोरोनाचे उपचाराधीन रुग्ण वाढत आहेत. शहरात कोरोनाबाबत बेफिकिरी सुरूच असल्याने ही संख्या वाढण्याची शक्यता पालिका प्रशासनाने वर्तवली आहे. त्यामुळे ऐवढ्या मोठ्या रुग्णसंख्येसाठी आरोग्य सुविधा पुरवताना प्रशासनाला मोठी कसरत करावी लागणार आहे. नवी मुंबई शहरात ११ डिसेंबर रोजी दैनंदिन कोरोना रुग्ण ३१ तर उपचाराधीन रुग्ण २९२ इतके होते. महिनाभरात हे चित्र बदलले असून मंगळवारी नवी मुंबईत दैनंदिन रुग्ण १८७३ तर उपचाराधीन रुग्ण १६,५७८ इतके झाले आहेत. यामुळे पालिकेच्या आरोग्य सेवेवर ताण आला असून सुविधांमध्ये वाढ करावी लागत आहे.

नवी मुंबईत कोरोनाच्या पहिल्या लाटेत शहरातील आरोग्य व्यवस्था कमी पडल्यानंतर पालिका प्रशासनाने दुसऱ्या लाटेत मोठ्या प्रमाणात आरोग्य सुविधांत वाढ केली होती. तरीही रुग्णवाढीच्या काळात रुग्णांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले होते. त्यामुळे कोरोनाची तिसरी लाट आली तर पूर्वतयारी असावी असा अंदाज बांधत पालिका प्रशासनाने तयारी केली आहे. मात्र या लाटेत प्रशासनाचे अंदाजही फोल ठरत असल्याचे दिसत आहे. महिनाभरापूर्वी शहरात कोरोनाची परिस्थिती अगदीच आटोक्यात होती. दैनंदिन रुग्ण संख्या ही ३० पर्यंत होती तर उपचाराधिन रुग्ण हे ३०० पेक्षा कमी होते, मात्र त्यानंतर हळूहळू रुग्णवाढ होत शहरातील सर्व चित्र बदलले आहे. आतापर्यंतचे सर्व उच्चांक मोडीत निघाले आहेत. नवी मुंबईत मंगळवारी १८७३ नवे कोरोना रुग्ण आढळले एकूण कोरोनाबाधितांची संख्या एक लाख २८ हजार २५१ पर्यंत गेली आहे. तर शहरात उपचाराधीन रुग्ण हे १६,५७८ इतके झाले आहेत. यात १०२२६ रुग्ण घरीच उपचार घेत असून ६३११ रुग्णांवर प्रत्यक्षात उपचार सुरू आहेत.

कोरोना चाचण्यांची संख्याही वाढवण्यात आली असून दिवसाला १५ हजारांपेक्षा अधिक कोरोना चाचण्या करण्यात येत आहेत. कोरोनाचा संसर्ग मोठ्या प्रमाणात वाढत असून पालिकेच्या आरोग्यसेवेवर पुन्हा ताण आला आहे. समूह संसर्ग सुरू आगामी काळात उपचाराधीन रुग्णांची संख्या २५ हजारांच्या घरात

> **नवी मुंबईत कोरोनाची स्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पालिका विविध उपाययोजना करत असून पालिकेला नागरिकांनी करोना नियमावली पाळून योग्य ते सहकार्य करण्याची आवश्यकता आहे.**
> **–प्रमोद पाटील,**
> **मुख्य आरोग्य अधिकारी**

जाण्याची शक्यता पालिका प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे पालिकेने एकीकडे रुग्णशय्या वाढवल्या जात असून अतिरिक्त कोरोनायोद्ध्यांचीही पालिकेला आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे पालिकेने भरती प्रक्रिया सुरू आहे.

गर्दीच्या ठिकाणी राज्य शासनाने घालून दिलेले नियम धाब्यावर बसविण्याचे सर्रास प्रकार सुरू आहेत. दिवसा जमावबंदी आणि रात्री संचारबंदी फारशी गांभीर्याने घेतलेली नाही. दिवसा गर्दी आणि रात्री मुक्तसंचार सुरूच आहे. त्यामुळे चाचणीपेक्षा रुग्णसंख्या चार पट असण्याची शक्यता आहे.



## पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाला समर्थन देण्यासाठी खारघरमध्ये स्वाक्षरी मोहीम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जगातील सर्वांत लोकप्रिय नेते तसेच आपल्या देशाचे कणखर नेतृत्व नरेंद्र मोदी पंजाब दौऱ्यावर असताना फिरोजपूर येथे पंजाब सरकारने ज्याप्रकारे मोदीजींवर हल्ला करण्यासाठी कट रचला होता. त्याचा निषेध करण्यासाठी तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेले अनेक धडाकेबाज निर्णय व त्यांच्या विचारासोबत असल्याच्या समर्थनार्थ खारघर मंडलाकडून स्वाक्षरी मोहीम मंगळवारी (दि.११) राबविण्यात आली.

या वेळी भारतीय जनता पक्ष खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक प्रवीण पाटील, मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, मंडल उपाध्यक्ष रमेश खडकर, सोशल मीडिया जिल्हा संयोजिका मोना अडवाणी, चिटणीस अनिता जाधव, महिला मोर्चा उपाध्यक्ष प्रतीक्षा कदम, प्रभाग ४ अध्यक्ष वासुदेव पाटील, सोशल मीडिया संयोजक अजय माळी, जेष्ठ नागरिक सेल संयोजक नवनीत मारू, आयटी सेल संयोजक रुपेश चव्हाण, शिक्षक सेल संयोजक संदीप रेड्डी, वैद्यकीय सेल संयोजक किरण पाटील, भटके विमुक्त मोर्चा संयोजक दिलीप आढे, सुमित सहाय, आशा शेडगे, अश्विनी भुवड, अशोक जंगीड, स्मिता आचार्य, संजय पाचपोर, हंसा पारघी, वैशाली प्रजापति, प्रकाशजी, अरविंद जाधव, नंदू दळवी, राजश्री नायडू, राजू तिवारी आदी उपस्थित होते.

भाजप कार्यकर्ते व नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन झालेला घटनेचा निषेध करून नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व भारताला महासत्तेकडे देईल, असा विश्वास दाखवत या स्वाक्षरी मोहिमेत उत्स्फूर्तपणे भाग घेतला.

# खारघरच्या उद्यानांतील खेळांचे साहित्य दुरुस्त करा

### भाजप नेते प्रभाकर घरत यांची मागणी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील प्लॉट नं. ४२ए मधील कै. महादेवबुवा घरत (भजन सम्राट) ज्येष्ठ नागरिक उद्यान व प्लॉ नं. ६ येथील कै. दि. बा. पाटील साहेब उद्यानामध्ये लहान मुलांसाठी असलेल्या खेळांच्या साहित्याची मोडतोड झाली आहे. त्यामुळे या साहित्याची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी भाजपचे रायगड जिल्हा सदस्य प्रभाकर घरत यांनी पनवेल महापालिका प्रशासनाकडे निवेदन देऊन केली आहे.

खारघरमधील प्लॉट नं. ४२ए मध्ये कै. महादेवबुवा घरत (भजन सम्राट) ज्येष्ठ नागरिक उद्यान व प्लॉ नं. ६ येथील कै. दि. बा. पाटील साहेब उद्यान हे सिडको तयार केले आहे. या उद्यानात तसेच लहान मुलांसाठी खेळणी, ज्येष्ठांसाठी चालणे, योगा करणे व विरंगुळा केंद्र आहे. त्यामुळे या उद्यानामध्ये लहान मुले मोठ्या प्रमाणात येतात तेथे खेळतात, परंतु त्या उद्यानामधील झोपाळे, घसरगुंडी, सिसॉ हे तुडलेले असून काही साहित्यांचे स्क्रू निघलेले आहेत. वस्तूंची मोडतोड झालेली आहे, म्हणून या साहित्यासह उद्यानातील अन्य तुटलेल्या साहित्याची दुरुस्ती करण्यात यावी. जेणेकरून तेथील मुलांना खेळता येईल व त्यांना इजा होणार नाही, असे प्रभाकर घरत यांनी पनवेल महापालिका प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नुमद केले आहे.

दरम्यान, प्लॉ नं. ६ येथील कै. दि. बा. पाटील साहेब उद्यान हे पनवेल महापालिकेकडे हस्तांतरीत झाले आहे तर प्लॉट नं. ४२ए मधील कै. महादेवबुवा घरत (भजन सम्राट) ज्येष्ठ नागरिक उद्यान याची हस्तांतरण प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे प्रभाकर घरत यांनी पनवेल महापालिका प्रशासनाकडे उद्यानातील दुरुस्तीसंदर्भात पत्रव्यवहार केला आहे.

## गव्हाण विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत जुनियर कॉलेजमध्ये स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य तसेच रयत को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक प्रमोद कोळी व जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे यांचे हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

या वेळी विद्यालयाच्या उपशिक्षिका हर्षला पाटील यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग सांगून त्याच्या जीवनकार्याचा वेधक आढावा घेतला.

या वेळी ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, विद्यालयाचे उपप्राचार्य जगन्नाथ जाधव, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, ज्येष्ठ अध्यापक सुनील गावंड, एकनाथ ठाकूर, शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे, प्रसन्न ठाकूर, प्रा. राजू खेडकर, प्रा. उमेश पाटील, प्रा. राजेंद्र चौधरी, सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर, प्रयोगशाळा प्रभारी चारूशीला ठाकूर, ज्युनिअर कॉलेज परीक्षा विभाग प्रमुख प्रा. जयवंती ठाकूर, प्रा. अर्चना पाटील, क्रीडा विभागप्रमुख जयराम ठाकूर, शिष्यवृत्ती विभाग प्रमुख द्रौपदी वर्तक, गुरूकुल प्रमुख संदीप भोईर, उपशिक्षिका संपदा म्हात्रे, अस्मिता पाटील, प्रणाली पाटील, उपशिक्षक सागर रंधवे, ग्रंथपाल महेश म्हात्रे, जनार्दन खैरे, अरूण कोळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन उपशिक्षिका हर्षला पाटील यांनी केले.



**पनवेल : महापालिकेच्या उपमहापौरपदी सीताताई पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे भाजप तालुका चिटणीस नामदेव जमदाडे यांनी अभिनंदन केले. या वेळी केवाळेचे सरपंच अशोक गायकर, वावंजे विभागीय अध्यक्ष रवींद्र पाटील उपस्थित होते.**

# मुर्बी गावात विकासकामांचे भूमिपूजन

## नगरसेवक अभिमन्यू पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील मुर्बी गावात स्मशानभूमी सुशोभीकरण व प्रतिक्षादालन या कामांसाठी नगरसेवक अभिमन्यू धर्मा पाटील यांनी पनवेल महापालिकेकडे पाठपुरावाकरून निधी मंजूर करून घेतला. त्या अनुषंगाने या कामांचे भूमिपूजन नुकतेच गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

माजी प्रभाग समिती सभापती व विद्यमान नगरसेवक अभिमन्यू पाटील यांनी आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली खारघर परिक्षेत्रांतर्गत मुर्बी गावातील स्मशानभूमी सुशोभीकरणाचे काम व प्रतिक्षादालन कामांसाठी पनवेल महापालिकेकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार महापालिकेचा निधी मंजूर झाल्याने काम सुरू झाले. त्यामुळे नगरसेवक अभिमन्यू पाटील यांनी आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर यांचे आभार मानले.

भूमिपूजन समारंभाला नगरसेवक अभिमन्यू पाटील यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक भगवान पाटील, श्रीकांत पाटील, काशीनाथ घरत, युवा नेते नितेश पाटील, मंगेश पाटील, मयूर घरत, अतुल पाटील, कुणाल पाटील, शशीकांत पाटील, रघुनाथ पाटील, सोमनाथ पाटील, सूरज गायकवाड आदी उपस्थित होते. नागरिकांच्या अडीअडचणी सोडविणारे व सेवासुविधा पुरविणारे नगरसेवक अभिमन्यू पाटील यांच्या कामांबद्दल नागरिक समाधान व्यक्त करीत असतात.



## उन्नती साळवी ठरली ‘स्टायलिन स्टार’

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथे राहणाऱ्या उन्नती विकास साळवी हिने नुकत्याच पुणे येथे झालेल्या रॉयल कॅनॉट बोट क्लब येथील शोमध्ये मिस स्टायलिन स्टार इंडिया २०२२चे विजेतेपद पटकाविले. त्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



खारघर येथे राहणारी १९ वर्षांची उन्नती विकास साळवी ही येरळा मेडिकल कॉलेज, खारघर येथे आयुर्वेदाची विद्यार्थिनी आहे. तिचे वडील पोलीस खात्यात अधिकारी आहेत. भावी काळात तिला सर्जन होण्याची महत्त्वाकांक्षा आहे. आयएनआयएफडी पनवेल येथे सोल सेन्सेशन ३. साठी शोस्टॉपर आहे. मिस मेस्मेरिक क्वीन इंडिया २०२१मध्ये ’प्रेक्षणीय डोळे’चे उपशीर्षक आणि मिस स्टायलिन स्टार इंडिया २०२२चे विजेतेपद उन्नतीने जिंकले आहे. पुणे रॉयल कॅनॉट बोट क्लब येथे हा शो नुकताच झाला.

याचबरोबर उन्नतीने इतर अनेक फॅशन शोमध्ये सहभाग घेतला असून त्यातसुद्धा प्राविण्य मिळविले आहे. या तिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

जासई येथील महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठानतर्फे लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत गुरुवारी (दि. १३) सकाळी ८.३० वाजता प्रकल्पग्रस्त रिक्षा चालक–मालक संघटना कामोठे जुई यांच्यातर्फे लोकनेते दि. बा. पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मशालीसह कामोठे येथे प्रयाण करण्यात येईल.

सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्यु. कॉलेज दहागाव विभाग जासई येथे लोकनेते दि. बा. पाटील यांच्या पुतळ्याला, थोर विभूतींना व स्मारकाला प्रतिष्ठानतर्फे हार अर्पण करून सकाळी १०.३० वा. जिजामाता हॉस्पिटलमध्ये बसविण्यात आलेल्या ‘दिबां’च्या अर्धपुतळ्याचे अनावरण अखिल आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष दशरथ पाटील यांच्या हस्ते करण्यात येईल. सकाळी ११ ते २ ‘दिबां’च्या ९६व्या जयंतीनिमित्त जिजामाता हॉस्पिटल जासई येथे मोफत वैद्यकीय तपासणी शिबिर, तसेच लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या जीवनावर विद्यार्थ्यांची भाषणे होतील. तरी दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## शिष्यवृत्तीत नवी मुंबई पालिकेच्या ४९ विद्यार्थ्यांचे यश

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

शिष्यवृत्ती परीक्षेत नवी मुंबई महापालिकेच्या शाळांतील इयत्ता पाचवीच्या ३४ तसेच इयत्ता आठवीच्या १५ अशा एकूण ४९ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

शाळा क्र. ४२ घणसोली येथील असून विद्या रामगिरे (२५८ गुण), प्राजक्ता घोरपडे (२५४ गुण) व वैदेही नवले (२५४ गुण) तसेच दिप्ती पाटील (२५० गुण) हे विद्यार्थी गुणानुक्रमे प्रथम तीन क्रमांकाचे मानकरी ठरले आहेत. आठवीची स्कॉलरशीप मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये प्रथम तीन क्रमांक शाळा क्र. ४२ घणसोली याच शाळेचे असून गणेश मोरे (२१० गुण), सुमीत तायडे (१९८ गुण) व सोनल खेडकर (१९२) या तीन विद्यार्थ्यांनी गुणानुक्रमे पटकाविला आहे. शाळा क्र. ५५, पाचवीच्या १०, आठवीच्या चार विद्यार्थ्यांनी, शाळा क्र. ९१ दिवा (३ विद्यार्थी), शाळा क्र. ३३ पावणे (२), शाळा क्र. ३१ कोपरखैरणे (२), शाळा क्र. १ बेलापूर (२), शाळा क्र. ४९ ऐरोली (१) अशा एकूण ३४ विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवीची शिष्यवृत्ती प्राप्त केलेली आहे. याशिवाय शाळा क्र. ३१ कोपरखैरणे (१ विद्यार्थी), शाळा क्र. ७७ यादवनगर (१ विद्यार्थी), शाळा क्र. ७८ गौतमनगर (१ विद्यार्थी) अशा एकूण १५ विद्यार्थ्यांनी इयत्ता आठवीची शिष्यवृत्ती प्राप्त केलेली आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३


**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणत्या सरकारी तेल कंपनीचे बाजारमूल्य सर्वांत अधिक आहे?**
***अ.)*** इंडियन ऑईल ***ब.)*** बीपीसीएल ***क.)*** ओएनजीसी ***ड.)*** एचपीसीएल

**२. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेल्या डीमॅट खात्यांची संख्या भारतात सध्या एवढी झाली आहे.**
***अ.)*** ४.३ कोटी ***ब.)*** ५.५ कोटी ***क.)*** १० कोटी ***ड.)*** ७.४ कोटी

**३. अप्रत्यक्ष कर असलेल्या गुड ॲण्ड सर्विस टॅक्स (जीएसटी) ची आतापर्यंतची सर्वाधिक मासिक वसुली एवढी झाली आहे.**
***अ.)*** १.१९ लाख कोटी रुपये ***ब.)*** १.४५ लाख कोटी रुपये
***क.)*** १.३९ लाख कोटी रुपये ***ड.)*** १.१० लाख कोटी रुपये




**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.**

## संपादकीय


# दंडेलशाहीला धक्का

विधिमंडळातील १२ आमदारांच्या निलंबनाच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी महाविकास आघाडी सरकारला अक्षरशः धारेवर धरले. भारतीय जनता पक्षाच्या १२ आमदारांना गेल्या वर्षी पावसाळी अधिवेशनात निलंबित करण्यात आले होते. या अन्याय्य निलंबनाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्याची सुनावणी सध्या माननीय न्यायालयासमोर सुरू आहे. सुनावणी अद्याप पूर्ण झाली नसली, तरी सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान केलेली टीकाटिप्पणी बरेच काही सांगून जाते.

**विधिमंडळातील १२ आमदारांचे निलंबन, माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांचा राज्य सरकारवरील जाहीर अविश्वास, तसेच महाराष्ट्र सरकारचा सीबीआयसारख्या स्वायत्त तपास यंत्रणेबद्दल असलेला दूषित दृष्टिकोन या मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी संताप व्यक्त केला. भारतीय जनता पक्षाच्या १२ आमदारांना गेल्या वर्षी पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरसकट निलंबित करण्यात आले होते. विधानसभेत गैरवर्तन केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. या बाराही जणांना एक वर्षासाठी विधिमंडळ कामकाजापासून, तसेच आमदारकीच्या कामापासून वंचित ठेवण्यात आले. न्या. खानविलकर आणि न्या. दिनेश महेश्वरी यांच्या पीठापुढे सुनावणी सुरू असून येत्या १८ जानेवारी रोजी पुढील सुनावणी पार पडेल व योग्य तो निवाडा होईल. परंतु दरम्यानच्या काळामध्ये निलंबित १२ आमदारांवरील अन्याय दूर होण्याचे संकेत मिळू लागल्याची हवा राजकीय वर्तुळात पसरू लागली आहे. विधिमंडळात निवडून आलेल्या आमदारांचे वर्षभरासाठी निलंबन करणे ही तर बडतर्फीपेक्षाही वाईट शिक्षा आहे. हे फक्त आमदारांनाच नव्हे तर त्यांच्या मतदारसंघांनाच शिक्षा देण्यासारखे होईल, असे निरीक्षण न्या. खानविलकर यांनी नोंदवले. निव्वळ निरीक्षण नोंदवून सर्वोच्च न्यायालय थांबलेले नाही. घटनेतील विशिष्ट कलमावर बोट ठेवून महाविकास आघाडीने कसे बेकायदा काम केले आहे हेदेखील त्यांनी स्पष्ट केले. नियमानुसार सदस्याला ६० दिवसांपेक्षा जास्त काळ निलंबित करण्याचा अधिकार विधानसभेला नाही. घटनेच्या कलम १९०(४) नुसार एखादा सदस्य सभागृहाच्या परवानगीशिवाय साठ दिवसांपेक्षा अधिक काळ गैरहजर राहिल्यास ती जागा रिक्त मानली जाते, याकडे सर्वोच्च न्यायालयाने लक्ष वेधले आहे. विधानसभेने दिलेल्या शिक्षेची न्यायालयाला चिकित्सा करता येत नाही, असा युक्तिवाद महाराष्ट्र सरकारतर्फे ज्येष्ठ वकील सुंदरम यांनी केला होता, परंतु तो देखील सर्वोच्च न्यायालयाच्या पीठाने फेटाळून लावला. सर्वोच्च न्यायालयाच्या या टीकाटिप्पणीमुळे अनेक महत्त्वाचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. आमदारांचे दीर्घकाळासाठी निलंबन करून महाविकास आघाडी सरकारने नेमके काय साधले या प्रश्नाचे उत्तर फक्त सुडाचे राजकारण एवढेच देता येईल. आमदारांवर निलंबनाची कारवाई केल्यामुळे त्यांचा मतदारसंघ उघड्यावर पडतो. त्या मतदारसंघाला विधिमंडळात प्रतिनिधित्वच नाकारले जाते हा मूलभूत मुद्दा आहे. हातात सत्ता आल्यावर बहुमताच्या जोरावर किती मनमानी करावी याला काही मर्यादा घटनेने घालून दिलेल्या आहेत. ज्या १२ आमदारांचे निलंबन झाले, त्यांना एवढी मोठी शिक्षा देण्याचे संयुक्तिक कारण काय हा प्रश्न आजवर अनुत्तरित राहिला आहे. गुन्हा कुठल्या स्वरूपाचा आहे त्यावरच शिक्षा किती द्यायची हे ठरत असते. भारतीय जनता पक्षाच्या त्या १२ आमदारांपैकी कुठलाही आमदार इतक्या मोठ्या शिक्षेला पात्र नाही हे सर्वच जाणून आहेत. सर्वोच्च न्यायालयाने हे सत्य अधोरेखित केले.**

**महाड तालुक्यात गेल्या महिनाभरात काही ठिकाणी बैलगाड्यांच्या शर्यती सार्वजनिकरीत्या झाल्या असताना पोलादपूर तालुक्यात रेड्यांच्या झोंब्यांवर बंदी का, असा सवाल तालुक्यातील झोंबी शौकीन करत आहेत. यासाठी लोकप्रतिनिधींमार्फत कायदा आणि सुव्यवस्थेवर दबावतंत्राचा वापर करून तालुक्यात कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध बदलीची कारवाई करण्यात येईल, असे खात्रीपूर्वक सूतोवाच झोंबी शौकिनांकडून केले जात आहे.**

# रेड्यांच्या झोंब्यांवर बंदी का?




**खबरबात**
**शैलेश पालकर**

महाड आणि पोलादपूर तालुक्यांतील सर्वच रेडे देवदिवाळीपर्यंत समोरासमोर आल्यावर नैसर्गिकरीत्या टक्करा मारतात. त्यांची पाठ सोडण्याची माहिती रेड्यांचे मालक असलेल्या शेतकऱ्यांना चांगली ज्ञात असते. धंदेवाईक झोंब्यांमध्ये अशा पाठ सोडविण्याची क्षमता असणाऱ्या शेतकऱ्यांना आणि पंचांना आयोजकांकडून चांगले मानधन दिले जाते. त्यामुळे स्वतःचे रेडे गोठ्यात बांधून जे शेतकरी दुसऱ्यांच्या रेड्यांची पाठ सोडवायला सरसावतात, त्यांना दुसऱ्यांचे रेडे काबूत आणता आले नाही, तर ते रेडे रक्तबंबाळ होतात अथवा ठारही होतात.

संत ज्ञानेश्वरांनी रेड्यांच्या तोंडून वेदपठण केल्याचे माहीत असूनही वारकरीबहुल आध्यात्मिक क्षेत्रात रेड्यांच्या झोंब्यांचे आकर्षण वाढीस लागणे, ही बाब अनाकलनीय आहे. एका गावातील राजकारण्यांनी झोंब्यांचे आयोजन केले होते. कोकणात अशा कामासाठी ग्रामदेवतेचा कौल घेण्याची प्रथा आहे आणि तसा कौल मिळाला नसतानाही झोंब्या लावून राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न काही लोकांनी केला. योगायोगाने या गावातील म्हैसकड्यावरून कोसळून दोन झुंजार रेड्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची रेड्यांची आत्महत्या अशी बातमी झाल्यानंतर याच राजकारण्यांनी रेड्यांच्या पाठीवर बसून झोंब्यांचे राजकारण करताना हिंदू परंपरा या शब्दाचा उच्चार केला. रेड्यांच्या पाठीवर बसणाऱ्याला यम म्हणतात, हे तालुक्यातील वारकरी बहुल संप्रदायाला माहिती असल्याने या यमांच्या नादी कोणी लागले नाही, मात्र झोंब्यांचा धंदा सुरूच राहील, अशी दर्पोक्ती करणाऱ्यांना या निमित्ताने कायद्याचा धाक बसला, मात्र यानंतर महाड तालुक्यासह रत्नागिरी जिल्ह्यातदेखील रेड्यांच्या झोंब्यांच्या आयोजनाची चर्चा सुरू असल्याने पोलादपूर तालुक्यातच यावर बंदी का, असा सवाल करण्यास तालुक्यातील झोंबी शौकिनांनी सुरुवात केली आहे. या रेड्यांच्या झोंब्या पुन्हा सुरू होण्यासाठी ज्यांच्याविरुद्ध पोलीस अधिकाऱ्यांनी यापूर्वी तक्रारी नोंदविल्या आहेत, अशा लोकप्रतिनिधींमार्फत तालुक्यात कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध गृहराज्य मंत्री आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रारवजा निवेदने पाठविली. त्यामुळे पोलादपूर तालुक्यात रेड्यांच्या झोंब्या सुरू होतील, असे खात्रीपूर्वक सूतोवाच झोंबी शौकिनांकडून केले जात आहे.

गेल्या आठवड्यात पोलादपूरलगतच्या खेड तालुक्यात रेड्यांच्या झोंब्या झाल्या. त्याचा झोंबीशौकीन पोलादपूरकरांनी तेथे बहुसंख्येने उपस्थित राहून आनंद घेतला. महाड तालुक्यातही मोठ्या संख्येने झोंब्या दरवर्षी होतात, मात्र पोलादपूर तालुक्यातच यावर बंदी का, असा सवाल तालुक्यातील झोंबी शौकीन करत आहेत. रेड्यांच्या झोंबीची लोकप्रियता आणि रेड्यांमध्ये पावसाळ्यानंतर झोंबी घेण्याची नैसर्गिक भावना लक्षात घेता या झोंब्यांना मुक्या जनावरांवर अत्याचाराचे स्वरूप देऊन झोंबी शौकिनांना कायद्याच्या कचाट्यात अडकविण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा अलिबाग भागात बैलगाडीच्या शर्यतींना जशी परवानगी मिळाली; त्याच धर्तीवर रेड्यांच्या झोंब्यांना परवानगी देण्यात यावी. या झोंब्यांमध्ये रेड्यांना कोणत्याही प्रकारे चाबकाचे फटके न मारता त्यांच्याकडून उत्स्फूर्तपणे टकरा मारल्या जात असल्याने या झोंब्यांना विशेष परवानगी मिळण्याची मागणी तालुक्यातील शौकिनांकडून होत आहे.

काही वर्षांपूर्वी रेड्यांच्या झोंब्यांचा खेळ पोलादपूर तालुक्यातून हद्दपार झाला असताना पोलिसांशी अर्थपूर्ण व्यवहारातून पुन्हा तुरळक ठिकाणी भरगच्च उपस्थितीत रेड्यांच्या झोंब्यांचे आयोजन केले जात आहे. कधी रेडा विजेता ठरत आहे तर कधी पराजित होत आहे, मात्र काही ठिकाणी रेड्यांनी स्वतःचा कडेलोट केल्याच्या घटनांनी या खेळाचे जीवघेणे स्वरूप उघड केले आहे.



# मोदीजींच्या समर्थनार्थ कर्जत भाजपच्या वतीने स्वाक्षरी मोहीम

**कर्जत : प्रतिनिधी**

आम्ही सर्व नागरिक पंतप्रधान मोदीजींच्या सोबत आहोत हे दर्शविण्यासाठी कर्जत भाजपच्या वतीने मंगळवारी (दि. ११) शहरातील लोकमान्य टिळक चौकात स्वाक्षरी मोहीम राबविली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पंजाब दौऱ्यावर असताना त्यांच्या सुरक्षेत तेथील काँग्रेस सरकारने अक्षम्य दिरंगाई, बेजबाबदारपणा करून एक प्रकारे विघटन शक्तींना मदतच केली. हे चुकीचे आहे, असा आरोप करत कर्जत भाजपने शहरातील लोकमान्य टिळक चौकात मंगळवारी आम्ही सर्व मोदीजींच्या सोबत आहोत, असा फलक लावला. व त्या फलकावर सह्या करून पाठिंबा दर्शवावा, असे आवाहन नागरिकांना केले. त्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

भाजपचे रायगड जिल्हा संघटक अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस दिपक बेहरे, रमेश मुंढे, कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, नगरसेवक बळवंत घुमरे, भाजप ओबीसी सेल अध्यक्ष प्रशांत उगले, मारुती जगताप, राहुल कुलकर्णी, मंदार मेहंदळे, विजय कुलकर्णी, संघटक अविनाश कोळी आदी या वेळी उपस्थित होते.




(छाया : विजय मांडे)

# खालापुरात मुंगूर माशांचा साठा जप्त

## मत्स्यव्यवसाय विभागाची कारवाई

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील महड येथे अवैध मुंगूर माशांचे संवर्धन होत असलेल्या ठिकाणी मत्स्यव्यवसाय विभागाचे उपआयुक्त महेश देवरे यांच्या पथकाने कारवाई करीत माशांचा साठा जप्त करून नष्ट केला. त्यानंतर अन्य ठिकाणी सुरू असलेल्या मुंगूर पालनावरदेखील कारवाई करण्याचा इरादा मत्स्यव्यवसाय विभागाने स्पष्ट केला.



(छाया : विनायक माडप)

राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार मुंगूर प्रजनन, मत्स्यपालन, वाहतूक व विक्री करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. मात्र खालापूर तालुक्यात महड, कुंभिवली, चौक हद्दीतील कोपरी गाव, माजगाव, मोहपाडा येथे प्रतिबंधीत प्रतिबंधित मुंगूर माशांचा व्यवसाय सुरू आहे. खालापूर तालुक्यातील महड येथील शासकीय जागेवर अतिक्रमण करून मुंगूर पालन तलाव सुरू असून त्याकडे स्थानिक प्रशासन डोळे झाक करीत असल्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठण्याची तयारी केली होती. अखेरीस मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रादेशिक उपआयुक्त महेश देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त सुरेश भारती, सहाय्यक अधिकारी अजया भाटकर, चेतन निवळकर व परवाना अधिकारी रश्मी आंबुलकर यांनी महड येथे कारवाई करीत मुंगूर माशांचा साठा जप्त केला. अशीच कारवाई तालुक्यातील अन्य मुंगूर तलावावर करावी अशी मागणी होत आहे.

# म्हसळ्यात स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ यांना अभिवादन

**प्रतिनिधी : म्हसळा**

येथील सार्वजनिक वाचनालयात बुधवारी (दि. १२) श्री स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन व अभिवादन करण्यात आले.

वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, ग्रंथपाल उदय करडे, सुजय कुसळकर, संभाजी शिंदे, दामोदर ऊर्फ आप्पा गुरव, धनंजय सरनाईक, विजय पुलेकर, लिपीक दिपाली दातार, सायली चोगले, व्ही. आर. कलबासकर, डि. व्ही. पालवे, अर्चना फाटक आदी या वेळी उपस्थित होते.




(छाया : संजय खांबेटे)

# पर्यटकांचे प्राण वाचविणाऱ्या कर्मचाऱ्यांचा जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून विशेष सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील काशीद समुद्रात बुडणाऱ्या तीन पर्यटकांचे प्राण वाचविणाऱ्या पोलीस कर्मचारी व जीवरक्षकाचा रायगड जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून विशेष सत्कार करण्यात आला.

पुणे कात्रज परिसरातील तीन पर्यटक रविवारी (दि. ९) दुपारी पोहण्यासाठी काशीद समुद्रात उतरले होते, मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडू लागले. या वेळी मुरूड पोलीस ठाण्याचे शिपाई प्रशांत प्रभाकर लोहार आणि जीवरक्षक राकेश रक्ते यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानमुळे श्रीकांत ढाके, गणेश प्रकाश पाटील आणि मुरलीधर सोनावणे या पर्यटकांना वाचविण्यात यश आले होते. त्याची दखल घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाने पोलीस शिपाई प्रशांत लोहार व जीवरक्षक राकेश रक्ते यांचा अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी मुरूडचे पोलीस निरीक्षक नितीन गवारे उपस्थित होते.



(छाया : संजय करडे)

## आरोग्य प्रहर

# आवळ्याच्या बियांचे फायदे

हिवाळ्यात आवळा खाणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. चवीला तुरट असलेला आवळा खरं तर आरोग्यासाठी एखाद्या खजिन्यापेक्षा कमी नाही, पण तुम्हाला माहीत आहे का, की आवळा बी डझनभर आजारांपासून संरक्षण करण्याचे काम करते. आवळ्याच्या बियांमध्ये अनेक पोषक घटक असतात. काही दिवस आवळा बी उन्हात वाळवून त्याची पावडर बनवून पाण्यासोबत प्यायल्यास आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांमध्ये फायदा होऊ शकतो.

**१. त्वचेची समस्या दूर होते :** तुम्हाला दीर्घकाळापासून दाद, खरूज आणि खाज यांसारख्या त्वचेच्या समस्यांचा सामना करावा लागत असल्यास तुम्ही आवळ्याच्या बिया वापरू शकता. यामुळे या समस्या दूर होतात आणि त्वचा समस्यामुक्त होते. यासाठी खोबरेल तेलात सुक्या बिया बारीक करून पेस्ट बनवा. आता ही पेस्ट प्रभावित भागावर लावा. असे केल्याने त्वचेशी संबंधित आजारांपासून आराम मिळतो.

**२. बद्धकोष्ठता दूर करा :** जर तुम्हाला दीर्घकालीन बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल, तर आवळ्याच्या बिया खूप फायदेशीर ठरू शकतात. बद्धकोष्ठतेपासून आराम मिळण्यासाठी आवळ्याचे दाणे बारीक करून त्याची पावडर बनवा. यानंतर तुम्ही ही पावडर कोमट पाण्यासोबत सेवन करू शकता. यामुळे तुमची बद्धकोष्ठतेची समस्या दूर होईल.

**३. उचकी थांबते :** जर अचानक तीव्र उचकी येऊ लागल्या, तर त्यातून त्वरित आराम मिळवण्यासाठी आवळ्याची पावडर बनवून मधासोबत सेवन करू शकता. यामुळे तुमची उचकी काही मिनिटांत दूर होईल.

**४. नाकातून होणारा रक्तस्त्राव थांबतो :** बऱ्याच लोकांना नाकातून रक्तस्त्राव होण्याची समस्या असते. नाकातून रक्तस्त्रावाची समस्या सहसा कडक उन्हाळ्यात उद्भवते. जर तुम्हाला ही समस्या टाळायची असेल तर आवळ्याच्या बियांना पाण्यात बारीक करून त्याची पेस्ट बनवा. यानंतर ही पेस्ट कपाळावर लावा आणि सरळ झोपा. यामुळे तुमच्या शरीरात थंडावा येईल आणि तुम्हाला आराम मिळेल.

**५. डोळ्यांसाठी फायदेशीर :** डोळ्यांना खाज, जळजळ, लालसरपणाची तक्रार असल्यास आवळ्याच्या बिया बारीक करून डोळ्यांच्या वर व खाली लावल्यास फायदा होतो. याशिवाय करवंदाच्या रसाचे एक-दोन थेंब डोळ्यात टाकल्यानेही डोळ्यांच्या दुखण्यात आराम मिळतो.

**६. धातुरोगात फायदेशीर :** १० ग्रॅम आवळ्याच्या बिया उन्हात वाळवा आणि बारीक करून पावडर बनवा. आता त्यात २० ग्रॅम साखर मिठाई पावडर मिसळून ठेवा. सकाळी रिकाम्या पोटी १ ग्लास पाण्यात एक चमचा पावडर मिसळा आणि १५ दिवस सतत सेवन करा. त्यामुळे निद्रानाश, शुक्राणूजन्य रोग इत्यादी समस्या दूर होतात.

**(औषधोपचार करण्यापूर्वी संबंधित तज्ज्ञांशी संपर्क साधा)**

# बोर्ले-जिते-कुंभे रस्त्याचे काम कासवगतीने

## स्थानिक त्रस्त



**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील जिते ग्रामपंचायत हद्दीतील बोर्ले-जिते-कुंभे या रस्त्याचे काम शासनाच्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून केले जात आहे. या रस्त्याच्या कामासाठी अडीच कोटींचा निधी मंजूर असून गेली महिनाभर रस्ता खोदून ठेवला आहे. कासवगतीने सुरु असलेल्या कामाबद्दल स्थानिक लोक कंटाळले आहेत.

जिते ग्रामपंचायत हद्दीतील बोर्ले-जिते-कुंभे या तीन किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम शासनाच्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर झाले आहे. या रस्त्याचे काम पेशवाई रस्त्यापासून सुरु केले आहे. त्यासाठी संपूर्ण रस्ताच बंद करण्यात आला आहे. नवीन पाईप मोऱ्या टाकण्यात येत असताना जुन्या पाईप मोऱ्या काढून टाकल्या जात आहेत. मात्र आरसीसी बांधकाम करून पाईप मोऱ्या टाकणे आवश्यक असताना केवळ खड्डे खोदून नवीन पाईप मोऱ्या टाकण्यात येत आहेत. मात्र मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांना हे काम पाहायला वेळ नाही असा आरोप ग्रामस्थ तहसीन सहेद यांनी केला आहे.

अडीच कोटी रुपये खर्चून सुरु असलेल्या या कामाची गती ही संथ आहे. कर्जतकडे जाणाऱ्या अवजड वाहनांना हा रस्ता बंद असल्याने वाहनचालक अधिक संतप्त झाले आहेत.

या रस्त्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून एक देखरेख समिती स्थापन करण्यात आली होती. त्या समितीमधील एक सदस्य शशिकांत मोहिते यांनी ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांना या रस्त्याच्या कामाबद्दल जाब विचारला आहे. मोहिते यांनी पेशवाई रस्ता बंद न करता कुंभे येथून रस्त्याचे काम सुरु करावे आणि शेवटी पेशवाई रस्त्यावरील काम हाती घ्यावे असे सुचवले आहे. पण देखरेख किंवा सल्लागार समितीच्या सदस्यांनी केलेल्या सूचनेकडे लक्ष द्यायलादेखील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांना वेळ नाही.

**“ मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या नियमानुसार आणि दर्जा सांभाळून रस्त्याचे काम केले जाईल. त्याच वेळी सध्या सुरू असलेल्या कामाला गती देण्यासाठी आम्ही ठेकेदार कंपनीला सूचना केल्या आहेत.**

**-राहुल चौरे, कनिष्ठ अभियंता, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, पनवेल**

# माथेरानमध्ये १५ ते १८ वयोगटातील मुलांच्या लसीकरणाला सुरुवात

**कर्जत : बातमीदार**

माथेरान नगरपालिका हद्दीतील १५ ते १८ वयोगटातील मुलांच्या लसीकरणाला बुधवार (दि. १२)पासून सुरुवात झाली. शहरातील दोन्ही शाळांमध्ये शिकणाऱ्या ९७ आणि शाळाबाह्य १२ मुलांची नोंद असून त्या सर्वांना पालिकेच्या बीजे रुग्णालयात कोव्हॅक्सिन लसीचा डोस देण्यास सुरुवात झाली.

माथेरान शहरात सरस्वती विद्या मंदिर आणि सेंट झेव्हियर्स अशा दोन शाळा असून या शाळांत शिक्षण घेणारी ९७ मुले या वयोगटात असून १२ मुले शाळाबाह्य आहेत. त्यांच्या नोंदी पालिकेने घेतल्या आहेत. त्यानुसार लसीकरण सुरु करण्यात आले आहे, अशी माहिती माथेरान नगर परिषदेच्या मुख्याधिकारी आणि प्रशासक सुरेखा भणगे यांनी दिली. यावेळी माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंतदेखील उपस्थित होत्या.



(छाया : संतोष पेरणे)



अलिबाग : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दीर्घायुष्य लाभावे यासाठी भाजपतर्फे बुधवारी अलिबाग येथील श्री काशीविश्वेश्वर मंदिरात महामृत्युंजय मंत्र जप करण्यात आला. भाजप तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, आध्यात्मिक आघाडी जिल्हा संयोजक केदार आठवले, सुनील दामले, जगदीश घरत, संतोष पाटील आदी या वेळी उपस्थित होते.

# जंजिरा किल्ल्याचा दरवाजा पुन्हा बंद

## पर्यटकांचा हिरमोड, स्थानिकांच्या स्वयंरोजगारावर गदा


**मुरूड : प्रतिनिधी**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पुरातत्त्व विभागाने जंजिरा किल्ल्यावर जाण्यास पर्यटकांना बंदी घातली आहे. त्यामुळे पर्यटकांचा हिरमोड झाला असून, पर्यटकांवर अवलंबून असलेल्या स्थानिकांच्या रोजगारावर गदा आली आहे.

कोरोनाच्या पहिल्या लाटेत जंजिरा किल्ल्यावर जाण्यास पर्यटकांना बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे सुमारे दोन वर्षांपासून मुरूडमधील पर्यटनावर अवलंबून असलेले व्यवसाय बंद होते. कोरोनाचे सावट कमी झाल्यानंतर गेल्या काही दिवसांपासून येथील पर्यटन स्थिरस्थावर होत होते.

दरम्यान, राज्यात सुरू असलेला कोरोना, ओमायक्रॉनचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य सरकारने पर्यटन स्थळांवर बंदी आणली आहे. मुरूड तालुक्यात कोरोना रुग्णाची संख्या अत्यल्प असली तरी गर्दी टाळण्यासाठी त्यामुळे जंजिरा किल्ल्याचा दरवाजा पुन्हा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे पर्यटक आल्या पावली माघारी फिरत आहेत.

जंजिरा किल्ला बंद झाल्याने बोटी चालवणाऱ्यांचा रोजगार बंद झाला आहे. किल्ल्याच्या परिसरात असणारे गॉगल विक्रेते, शहाळी विक्रेते, टोपी विक्रेते, सरबत व चहा व्यवसायिक अडचणीत आले आहेत. हॉटेल व लॉजिंग व्यवसायांनासुद्धा मोठा आर्थिक फटका सहन करावा लागणार आहे.



(छाया : संजय करडे)

# पावसाच्या शिडकाव्याने कोसळला महावितरणचा खांब

## पोलादपुरातील कालवली पाटीलवाडी दोन दिवस अंधारात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील रविवारी पहाटे शिंपडलेल्या अवकाळी पावसामुळे चक्क विद्युतवाहक तारा असलेला एक खांब कोसळला. त्याकडे महावितरणच्या पोलादपूर तालुक्यातील अभियंत्यांकडून दूर्लक्ष करण्यात आल्याने कालवली पाटीलवाडीतील ग्रामस्थांना दोन दिवस अंधारात काढावे लागले.

पोलादपूर तालुक्यात रविवारी पहाटेच्या सुमारास अवकाळी पाऊस शिंपडल्यासारखा पडल्यानंतर कालवली स्टॉपच्या मागील बाजूच्या डीपीजवळील विजेचा एक खांब जमिनीवर कोसळला. या खांबावरील विद्युतवाहक तारांमुळे आजूबाजूचे खांबदेखील तिरके झाले. कालवली पाटीलवाडी ग्रामस्थांनी या घटनेची माहिती महावितरणच्या अभियंत्यांना सांगितली. मात्र, रविवारी दिवसा तसेच सोमवारीदेखील महावितरणच्या अभियंत्यांनी या घटनेची दखल घेतली नाही. काही ग्रामस्थांनी मध्यस्थांमार्फत कार्यकारी अभियंता पाचपोहे यांच्याकडे ही समस्या मांडून तातडीने कार्यवाहीची अपेक्षा व्यक्त केली असता त्यांनी तातडीने विद्युतपुरवठा सुरू होण्यासाठी खांब बदलण्याची ग्वाही दिली. कोसळलेल्या खांबाच्या जागी नवीन खांब बसल्यानंतर दोन दिवसांनी कालवली पाटीलवाडीचा वीजपुरवठा सुरू झाला.



(छाया : शैलेश पालकर)

# अलिबागमध्ये ७५ कोटी सूर्यनमस्कार संकल्प

**अलिबाग : प्रतिनिधी**

येथील जेएसएम कॉलेज राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि भारत स्वाभिमान न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. १२) राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून मायक्रोसॉफ्ट टीम्स ॲपच्या माध्यमातून ७५ कोटी सूर्यनमस्कार संकल्प कार्यक्रम आयोजित केला होता.

भारतातील योगासनाचा खेळ म्हणून प्रसार करणे आणि आपल्या देशातील तरुणांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त म्हणजेच अमृत मोहत्सव वर्षानिमित्त नॅशनल योगासन स्पोर्ट्स फेडरेशन (NYSF) व इतर चार संस्थानी ३० राज्यांमध्ये ७५० दशलक्ष म्हणजेच ७५ कोटी सूर्यनमस्कार करण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमात जेएसएम महाविद्यालयाने सहभाग घेतला आहे. यामध्ये www.75surynamaskar.com या वेबसाईटवर महाविद्यालयाचे रेजिस्ट्रेशन केले असून महाविद्यालयच्या एकूण १९३३ विद्यार्थी व ३१ शिक्षक यांनी भाग घेतला आहे. या उपक्रमांतर्गत १२ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत पुढील २१ दिवस रोज किमान १३ सूर्यनमस्कार करण्याचे आवाहन सर्वांना केले आहे.

या उपक्रमाचाच एक भाग म्हणून स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून बुधवारी सकाळी महाविद्यालयात ७५ कोटी सूर्यनमस्कार उपक्रमाचा उद्घाटन कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला व दैनंदिन जीवनात निरोगी आयष्यासाठी सर्वांनी रोज सूर्यनमस्कार करावेत असे आवाहन केले. त्यानंतर भारत स्वाभिमान न्यास रायगड विभागाचे प्रभारी दिलीप गाटे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सूर्यनमस्कार करण्याचे फायदे, सूर्यनमस्कार योग्य पद्धतीने कसा करावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच प्राणायाम करण्याचे महत्व विशद केले. त्यानंतर त्यांनी सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक दाखवले. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी सदर उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रविण गायकवाड यांनी केले. महाविद्यालयाचे प्रा. डॉ. मोहसीन खान, डॉ. प्रेम आचार्य, डॉ. मीनल पाटील, डॉ सुनील आनंद, बी. आर. गुरव व इतर प्राध्यापक, शिक्षक, यांच्यासह विद्यार्थी व स्वयंसेवक यावेळी उपस्थित होते. डॉ. ईश्वरदास कोकणे यांनी आभार मानले.


**Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**

**Plot No. 08, Janardan Atmaram Bhagat Marg, Sector-14, CIDCO Colony, Opp. Railway Station, New Panvel (E), Raigad, 410206**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE POST OF INTERNAL AUDITOR FROM THE ACADEMIC YEAR 2021-2022**

**(Running Schools, Junior Colleges and Senior Colleges in Raigad District)**

- **Internal Auditor**
  B.Com./ M.Com./ C.A. having experience in internal audit of State Board and CBSE Board Schools, Junior Colleges and Senior Colleges with affiliated and Autonomous Status. Experience in Tally working is must
- Applications with full details should reach to the **CHAIRMAN, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel,** Plot No. 08, Janardan Atmaram Bhagat Marg, Sector-14, CIDCO Colony, Opp. Railway Station, New Panvel (E), Raigad, Maharashtra 410206.
- **Last date for application - Tuesday 25th January, 2022**
- Candidates may submit the application by email to jbspsanstha1992@gmail.com and jbsp123_sanstha@yahoo.in
- If required Contact :- **Mrs. Suvarna Chaudhari – 9222161835** / Office : **022-27462579**

**Hon. Shri. Ramsheth Thakur – Ex- M.P.**

**CHAIRMAN,** JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA PANVEL



**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, **मौजे कोंडले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड** येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिंच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत वा जमिन ही आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कोंडले, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | भुधारणा पध्दती | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| रियाज अहमद | १३/१७ | भोग. वर्ग १ | ०-१४-९० | २.१२ |
| अलनसीर पठाण, अलनसीर महमद शफी मिर्झा, बेगम अलनसिर पठाण इलियास अलनसिर पठाण अनिसा जाफर बेग रियाज अलनसिर पठाण | १३/१८ | भोग. वर्ग १ | ०-४३-००<br>पोट खराबा ०-०३-३०<br>क्षेत्र ०-४६-३० | ५.२५ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१४ दिवसांच्या आत** आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह **खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.** जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल

दिनांक: १२/०१/२०२२


**सही/-**

**मि ॲड. सतिश स. फडके**

(ॲडव्होकेट हायकोर्ट)

**पत्ता :** ऑफिस नं. बी-२, प्लॉट नं.१०४, धवलगिरी को.ऑ. हौ.सो., पिसपार्क हॉटेलजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६, मोबा नं. ८८९८२१७५५५


# महाड आणि पालीत जिजाऊ यांना अभिवादन





**महाड : प्रतिनिधी**

कोरोनाचे नियम पाळून पाचाड येथील जिजाऊंच्या समाधी स्थळी व महाड शहरात बुधवारी (दि. १२)जिजाऊ जयंती साधेपणाने साजरी करुन राजमातेला अभिवादन करण्यात आले.

राजमाता जिजाऊ यांची जयंती बुधवारी सर्वत्र साजरी करण्यात आली, मात्र कोरोना संसर्ग टाळण्यासाठी मोठे कार्यक्रम मात्र टाळण्यात आले. आमदार भरत गोगावले आणि पंचायत समिती सभापती सिध्दी खांबे यांनी पाचाड येथील राजमाता जिजाऊंच्या समाधी स्थळी जाऊन त्यांना अभिवादन केले तर नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांनी नगरसेवकांसह शहरातील राजमाता जिजाऊ उद्यानातील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांनीदेखील राजमातेला अभिवादन केले.

**पाली : प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊ यांनी अठरापगड जातीच्या मावळ्यांना शिवराय व शंभुराजांच्या नेतृत्वाखाली एकत्रीत करुन स्वराज्याची निर्मिती केली. व रयतेचे स्वराज्य निर्माण करून जगासमोर आदर्श निर्माण केला, असे प्रतिपादन शरद गोळे यांनी बुधवारी (दि. १२) पाली येथे केले.

महापरिवर्तनवादी पत्रकार संघाच्या वतीने बुधवारी पालीसह सुधागड तालुक्यात ठिकठिकाणी राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पाली येथे झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. हभप महेश पोंगडे महाराज, बशीर परबलकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

संस्थेचे जिल्हा उपाध्यक्ष भास्कर लेंडी, संस्थेचे सचिव जतीन मोरे, ॲड. राकेश पाटील, धम्मशील सावंत, संतोष भोईर, विकी भालेराव, कैलास दळवी, महिपती जांभुलकर, गणेश कदम, नारायण पांगारे, भाईसाहेब बेलोसे, प्रवीण यादव आदींसह मान्यवर उपस्थित होते.



(छाया : धम्मशील सावंत)

# प्रो कबड्डी : यू मुंबाची पाटणापुढे शरणागती, तर तेलुगू टायटन्सवर गुजरात भारी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

प्रो कबड्डी लीगच्या ४७व्या सामन्यात, पाटणा पायरेट्सने यू मुंबाचा ४३-२३ असा पराभव करून गुणतालिकेत पहिले स्थान मिळवले. पाटणा पायरेट्सचा आठ सामन्यांमधला हा सहावा विजय आहे, तर यू मुंबाचा आठ सामन्यांमधला हा दुसरा पराभव आहे. यू मुंबाचा संघ पाचव्या स्थानावर आहे. नीरज कुमारने पाटणाच्या बचावात चमकदार कामगिरी केली आणि त्याला ८ टॅकल पॉइंट मिळाले.

यू मुम्बासाठी, अभिषेक सिंगने सर्वाधिक ८ रेडिंग गुण मिळवले, परंतु तो संघाला एकतर्फी पराभवापासून वाचवू शकला नाही. पाटणा पायरेट्ससाठी नीरजशिवाय मोहम्मदराझानेही बचावात हाय-५ पूर्ण केला. सचिन आणि कर्णधार प्रशांत कुमार राय यांनी चढाईत प्रत्येकी ७ गुण घेतले.



दुसऱ्या सामन्यात गुजरात जायंट्सने तेलुगू टायटन्सविरुद्ध सोपा विजय नोंदवला. राकेश सुंगरोयाने केलेल्या दमदार आक्रमणामुळे गुजरातने तेलुगू टायटन्सला ४०-२२ असे हरवले. गुजरात जायंट्सचा आठ सामन्यांमधला हा दुसरा विजय आहे आणि त्याव्यतिरिक्त त्यांचे दोन सामने बरोबरीत सुटले आहेत, तर तेलुगू टायटन्स संघाने आठ पैकी सहा सामने गमावले आहेत आणि त्यांचे दोन सामने बरोबरीत सुटले आहेत. गुजरातच्या राकेशने १६ रेडिंग गुण मिळवले.

पहिल्या सत्रातनंतर गुजरात जायंट्सने २०-१३ अशी चांगली आघाडी घेतली. पहिल्या १०-१२ मिनिटांत सामना जवळपास बरोबरीत होता, पण गुजरात जायंट्सने १३व्या मिनिटाला तेलुगू टायटन्सला ऑलआऊट करत आघाडी घेतली आणि तिथून टायटन्स पिछाडीवर पडला. उत्तरार्धात रजनीशने सुपर १० पूर्ण करत सामन्यात १२ गुण मिळवले, पण तो तेलुगू टायटन्सला एकतर्फी पराभवापासून वाचू शकला नाही. रजनीशशिवाय तेलुगू टायटन्सच्या एकाही खेळाडूला ५ गुण घेता आले नाहीत आणि हेच त्यांच्या पराभवाचे मुख्य कारण ठरले.

# रेवदंडा प्रीमियर लीगमध्ये साई स्पोर्टस संघ विजेता

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा हरेश्वर मैदानात टेनिस बॉल मर्यादित षटकांचे प्रीमियर लीग सामने दि. ८, ९ जानेवारी रोजी झाले. यामध्ये साई स्पोर्टस संघ विजेता ठरला. पहिल्या फेरीचे सर्व सामने पाच षटकांचे खेळविण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी दुशांत झावरे संघ मालक असलेले साई स्पोर्टस ठरला, तर द्वितीय क्रमांक अनुज कदम व केतन शेड्ये मालक असलेल्या आराध्य इलेव्हन संघाने पटकाविला. त्याचबरोबर नविद मुकामद व विनायक मानाजी संघमालक असलेला रेवदंडा रॉयल्स संघ, दीपेश पाटील, गौरव वडके, औकार वडके संघ मालक असलेला ड्रीम लँड संघाने सेमीफायनलपर्यंत धडक दिली.



(छाया : महेंद्र खैरे)

स्पर्धेत कल्पेश नाईक, समीर वर्तक, रितेश राऊत, गौरव वडके, सौरभ शेळके, रोहन भोईर यांनी उत्कृष्ट फलदांजी केली, तर गोलदांजीमध्ये इर्शाद पटवी यांनी स्पर्धेत शानदार गोलदांजीसह फलदांजी केली. आकाश गायकर यांनी उत्कृष्ट गोलदांजीचे प्रात्यक्षिक दाखवून दिले. अविनाश झावरे यांनी एकाच षटकांत ठोकलेल्या २२ धावा संस्मरणीय ठरल्या. स्पर्धेतील प्रथम क्रमांकास भव्य चषक व रोख रक्कम २० हजार रुपये, तसेच द्वितीय क्रमांकास भव्य चषक व रोख रक्कम १० हजार रुपये देण्यात आले. उत्कृष्ट गोलदांज, उत्कृष्ट फलदांज व मालिकावीर यांना चषक प्रदान करण्यात आला. स्पर्धेचे आयोजन अ‍ॅड. रोहित भोईर आणि मित्रमंडळाच्या वतीने करण्यात आले होते. अंतिम विजेत्या साई स्पोर्टस संघावर अभिनदंनाचा वर्षाव होत आहे.

## भारत-पाकिस्तान आता दरवर्षी भिडणार?

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट वैर सर्वश्रुत आहे. जेव्हा-जेव्हा दोन्ही संघ एकमेकांशी भिडतात, तेव्हा मैदानावरील रोमांच शिगेला असतो. जगभरातील चाहतेही या क्षणाची वाट पाहत आहेत. आयसीसी टी-२० विश्वचषक २०२१ मध्ये दोन्ही संघांची शेवटची गाठ पडली होती. आता आपल्याला दरवर्षी या दोन संघांमधील क्रिकेट सामने पाहता येणार असल्याचे संकेत आहेत.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष आणि पाकिस्तानचे माजी कर्णधार रमीझ राजा यांना दरवर्षी चार देशांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका आयोजित करायची आहे, ज्यामध्ये पाकिस्तान आणि भारताच्या संघांचाही समावेश आहे. याबाबतचा प्रस्ताव तयार करून आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले. या मालिकेत भारताव्यतिरिक्त पाकिस्तान, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाने सहभागी व्हावे, असे राजांनी सांगितले. ही मालिका चार देशांमध्ये रोटेशनच्या आधारावर आयोजित केली जाईल.

# रूपेशदादा पाटील ११ मनसे संघ एचव्हीपीएलचा विजेता



**पेण : प्रतिनिधी**

हमरापूर विभाग प्रीमियर लीग (एचव्हीपीएल) क्रिकेट स्पर्धा २०२२मध्ये अटीतटीच्या लढतीत रूपेशदादा पाटील ११ मनसे या संघाने कुलदैवत जोहे संघाचा पराभव करून विजेतेपद पटकाविले. तृतीय क्रमांक भाई निळकंठ ८१ व चतुर्थ क्रमांक आर्या इंटरप्रायझेस अद्वैत दादर या संघांनी मिळविला.

या स्पर्धेचे उद्घाटन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले होते. स्पर्धेदरम्यान स्व. पिंट्याशेठ पाटील यांच्या पत्नी स्मिताताई पाटील, युवा नेते ललित पाटील, सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे, मनसे तालुका अध्यक्ष रूपेश पाटील, हमरापूरचे सरपंच प्रदीप म्हात्रे, गोपीनाथ मोकल, दीपक मोकल, सचिन पाटील, नवनाथ मोकल, सुदर्शन पाटील, निखिल पाटील, विश्वास पाटील, समीर माळी, पत्रकार विजय मोकल, दीपक लोके, नरेश पवार, सुभाष टेंबे आदींनी सदिच्छा भेट दिली.

स्पर्धेचे बक्षीस वितरण रायगड जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते तथा भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, युवा नेते ललित पाटील, जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, शशिकांत भगत, भरत साळवी, रूपेश पाटील, हमरापूरचे सरपंच प्रदीप म्हात्रे, गोपीनाथ मोकल, देवेश घासे, सौरभ पाटील, अनिकेत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. विजेत्या संघांना पारितोषिक देण्यात आले. अंतिम सामन्यातील सामनावीर कपिल कोळी याला वॉशिंग मशीन देण्यात आली, तर मालिकावीरचा मानकरी ठरलेल्या प्रसाद पाटीलला बाईक देऊन गौरविण्यात आले.

## विराटला दिलेले चॅलेंज ट्विटर युजरला पडले महागात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत, दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळल्या जाणाऱ्या तिसऱ्या आणि निर्णायक सामन्याआधी विराटला सोशल मीडियावर एका यूजरने ट्रोल केले. त्याला ही ट्रोलिंग सुमारे सात लाख रुपयांसाठी महाग पडली.

वास्तविक, भारत दक्षिण आफ्रिका कसोटी मालिकेतील तिसर्या सामन्यापूर्वी चिकू नावाच्या एका ट्विटर युजरने कर्णधार विराट कोहलीचा फोटो शेअर करत लिहिले की, उद्या विराट कोहलीने अर्धशतक ठोकले तर मी सर्वांना १०० रुपये देईन. जे माझे हे ट्विट रिट्विट+लाइक करतील.





**पनवेल : भारतीय संस्कृती, परंपरेची जगाला ओळख करून देणारे स्वामी विवेकानंद, तसेच स्वराज्य निर्मिती ही एकच आस जन्मभर उराशी बाळगून ती पूर्णत्वास नेणाऱ्या राजमाता जिजाऊ यांची जयंती पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपमहापौर सीता पाटील, नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, मनोज भुजबळ, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, गौरव कांडपिळे, चिन्मय समेळ, शहर अध्यक्ष रोहित जगताप, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अभिवादन केले. (छाया : लक्ष्मण ठाकूर)**

## इंडिया खुली बॅडमिंटन स्पर्धा
# अश्मिताचे पाचव्या मानांकित एव्हगेनियाला नमवले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

युवा बॅडिमटनटू अश्मिता छलिहाने इंडिया खुल्या बॅडिमटन स्पर्धेत मंगळवारी पहिल्या धक्कादायक निकालाची नोंद करताना पाचव्या मानांकित एव्हगेनिया कोसेत्सकायाला पराभूत केले. अग्रमानांकित पी. व्ही. सिंधूने महिला एकेरीची दुसरी फेरी गाठली. पुरुष एकेरीत विश्वविजेत्या लो कीन येवला पहिल्या विजयासाठी तीन गेमपर्यंत झगडावे लागले, तर किदम्बी श्रीकांतने दिमाखदार विजय नोंदवला.

लो याने कॅनडाच्या शिओडाँग शेंगला १६-२१, २१-४, २१-१३ असे नमवले. श्रीकांतने सिरी वर्मावर २१-१७, २१-१० असा विजय मिळवला. चिराग सेनचे आव्हान मात्र सलामीलाच संपुष्टात आले. बिगरमानांकित छलिहाने फक्त ३१ मिनिटांत जागतिक क्रमवारीत २८व्या क्रमांकावरील रशियाच्या कोसेत्सकायाला २४-२२, २१-१६ असे नामोहरम केले. याचप्रमाणे दोन ऑलिम्पिक पदकविजेत्या सिंधूने श्रीकृष्णा प्रिया कुदारावल्लीवर २१-५, २१-१६ असा विजय मिळवला.

# जोकोव्हिचच्या व्हिसावरून दोन देशांच्या पंतप्रधानांमध्ये चर्चा



**मेलबर्न : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियन खुली ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धा सुरू होण्यासाठी एका आठवड्याहून कमी अवधी शिल्लक असतानाही नोव्हाक जोकोव्हिचच्या समावेशाबाबत संभ्रम कायम आहे. ऑस्ट्रेलियन सरकारने जोकोव्हिचचा व्हिसा पुन्हा रद्द करण्याचा इशारा दिल्यामुळे मंगळवारी ऑस्ट्रेलिया आणि सर्बिया देशाच्या पंतप्रधानांनी सदर प्रकरणावर चर्चा केली. वैद्यकीय सवलतीच्या आधारे लसीकरणाविना मेलबर्नला दाखल झालेल्या सर्बियन जोकोव्हिचला विमानतळावर अडवण्यात आले. जोकोव्हिचचा व्हिसा ऑस्ट्रेलियन सरकारने रद्द केल्यामुळे हे प्रकरण न्यायालयात पोहोचले. सोमवारी न्यायालयाने जोकोव्हिचच्या बाजूने निर्णय दिला.

ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान स्कॉट मॉरिसन आणि सर्बियाच्या पंतप्रधान अ‍ॅना ब्रनबिच यांच्यात यासंबंधी दूरध्वनीवरून संभाषण झाले. 'मॉरिसन यांनी जोकोव्हिचचा व्हिसा रद्द करण्यामागची कारणे आणि करोना साथीच्या पार्श्वभूमीवर आखण्यात आलेल्या नियमांची माहिती अ‍ॅना यांना दिली. जोकोव्हिचबाबत लवकरच अंतिम निर्णय घेण्यात येईल,' असे 'ट्वीट' मॉरिसन यांच्या अधिकृत खात्यावरून करण्यात आले.




राम प्रहर
# अर्थसाक्षर प्रश्नमंजुषा

दैनिक राम प्रहरमध्ये दर रविवारी अर्थ प्रहर सदर प्रकाशित होते. या सदरातून वाचकांना अर्थविषयक माहिती देण्यात येते. ही माहिती 'राम प्रहर'च्या वाचकांसाठी लाभदायक ठरत असते. याच सदरात दर रविवारी आता वाचकांसाठी प्रश्नमंजुषा सुरू करण्यात आली आहे.

'अर्थसाक्षर' या शीर्षकाखाली दर रविवारी प्रश्नमंजुषेमध्ये वाचकांना तीन प्रश्न विचारण्यात येतील. या प्रत्येक प्रश्नासोबत चार पर्यायी उत्तरे दिली जातील. त्यातील योग्य उत्तर वाचकांनी निवडायचे आहे. निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या 7738106009 या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

या तिन्ही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तिन्ही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील. तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com